# महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित गट- अ व गट-ब परीक्षा

**१. सेवा/संवर्ग व पदे याबाबतचा संक्षिप्त तपशील:-**

**१.१** राज्य शासनाच्या सेवेतील खालील संवर्गातील पदे शासनाच्या मागणीनुसार व पदांच्या उपलब्धतेनुसार सदर परीक्षेमधून भरण्यात येतात :-

| अ.क्र. | संवर्ग | वेतनसूची (Pay Matrix) | नियुक्तीचे ठिकाण | उच्च पदावर बढतीची संधी |
|---|---|---|---|---|
| **(एक)** | **राज्य सेवा परीक्षा :-** | | | |
| | (१) उप संचालक/प्रकल्प अधिकारी (एकात्मिक अदिवासी विकास प्रकल्प)(श्रेणी एक) / उपायुक्त, गट-अ | S-२३ : रूपये ६७७००-२०८७०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते. | महाराष्ट्रात कोठेही | सह संचालक व त्यापुढील पदे |
| | (२) उप जिल्हाधिकारी, गट - अ | S-२० : रूपये ५६१००-१७७५०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते. | महाराष्ट्रात कोठेही | उप जिल्हाधिका-यांच्या निवडश्रेणीत व त्यापुढील पदे |
| | (३) पोलीस उप अधीक्षक/सहायक पोलीस आयुक्त, गट-अ | S-२० : रूपये ५६१००-१७७५०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते. | महाराष्ट्रात कोठेही | पोलीस अधीक्षक / पोलीस उपायुक्त व त्यापुढील पदे |
| | (४)सहायक राज्यकर आयुक्त,गट-अ | S-२० : रूपये ५६१००-१७७५०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते. | महाराष्ट्रात कोठेही | राज्यकर उपायुक्त व त्यापुढील पदे. |
| | (५) उपनिबंधक, सहकारी संस्था,गट-अ | S-२० : रूपये ५६१००-१७७५०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते. | महाराष्ट्रात कोठेही | सहनिबंधक सहकारी संस्था व त्यापुढील पदे |
| | (६)उप मुख्य कार्यकारी अधिकारी/ गट विकास अधिकारी (उच्च श्रेणी),गट-अ | S-२० : रूपये ५६१००-१७७५०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते. | महाराष्ट्रात कोठेही | महाराष्ट्र विकास सेवेतील वरिष्ठ पदावर. |
| | (७) सहायक संचालक, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, गट-अ | S-२० : रूपये ५६१००-१७७५०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते. | महाराष्ट्रात कोठेही | महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, गट -अ (वरिष्ठ)व त्यापुढील पदे |
| | (८) मुख्याधिकारी,नगरपालिका/परिषद, गट-अ | S-२० : रूपये ५६१००-१७७५०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते. | नगरपालिका/ नगर परिषद क्षेत्रात | निवड श्रेणीतील पदावर |
| | (९) अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, गट-अ | S-२० : रूपये ५६१००-१७७५०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते. | महाराष्ट्रात कोठेही | उपायुक्त (वरिष्ठ) व त्यापुढील पदे |
| | (१०) शिक्षणाधिकारी, महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट-अ (प्रशासन शाखा) | S-२० : रूपये ५६१००-१७७५०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते. | महाराष्ट्रात कोठेही | शिक्षण उप संचालक व त्यापुढील पदे |
| | (११) प्रकल्प अधिकारी (एकात्मिक अदिवासी विकास प्रकल्प)(श्रेणी दोन)/ सहायक आयुक्त, गट-अ | S-२० : रूपये ५६१००-१७७५०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते. | महाराष्ट्रात कोठेही | उपसंचालक/प्रकल्प अधिकारी (एकात्मिक अदिवासी विकास प्रकल्प) (श्रेणी एक) / उपायुक्त व त्यापुढील पदे |
| | (१२) उद्योग उप संचालक (तांत्रिक), गट-अ | S-२० : रूपये ५६१००-१७७५०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते. | महाराष्ट्रात कोठेही | अधीक्षकीय उद्योग अधिकारी, गट-अ व त्यापुढील पदे |
| | (१३) बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी)/सहायक आयुक्त/परिविक्षा अधीक्षक/ जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी/ जिल्हा कार्यक्रम अधिकारी(महिला व बाल विकास) जिल्हा परिषद, गट-अ, (सर्वसाधारण राज्य सेवा) | S-२० : रूपये ५६१००-१७७५०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते. | महाराष्ट्रात कोठेही | उप आयुक्त व त्यापुढील पदे |
| | (१४) तहसिलदार, गट – अ | S-१९ : रूपये ५५१००-१७५१०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते. | महाराष्ट्रात कोठेही | उपजिल्हाधिकारी व त्यापुढील पदे |
| | (१५) सहायक आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता गट-अ | S-१८ : रूपये ४९१००-१५५८०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते. | महाराष्ट्रात कोठेही | उप आयुक्त व त्यापुढील पदे |
| | (१६) सहायक कामगार आयुक्त, गट - अ | S-१८ : रूपये ४९१००-१५५८०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते. | महाराष्ट्रात कोठेही | उप आयुक्त व त्यापुढील पदे |
| | (१७) सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, गट -अ | S-१६ : रूपये ४४९००-१४२४०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते. | महाराष्ट्रात कोठेही | उप प्रादेशिक परिवहन अधिकारी,गट-अ व त्यापुढील पदे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | **(१८)** उपशिक्षणाधिकारी, महाराष्ट्र शिक्षण सेवा,गट-ब (प्रशासन शाखा) | S-१७ : रूपये ४७६००-१५११००अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते. | महाराष्ट्रात कोठेही | शिक्षणाधिकारी व त्यापुढील पदे |
| | **(१९)** मंत्रालयीन विभागातील कक्ष अधिकारी, गट-ब | S-१७ : रूपये ४७६००-१५११००अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते. | फक्त मुंबई | अवर सचिव व त्यापुढील पदे |
| | **(२०)** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यालयातील कक्ष अधिकारी, गट-ब | S-१७ : रूपये ४७६००-१५११००अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते. | फक्त नवी मुंबई | अवर सचिव व त्यापुढील पदे |
| | **(२१)** लेखा अधिकारी,महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, गट -ब | S-१६ : रूपये ४४९००-१४२४०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते. | महाराष्ट्रात कोठेही | महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, गट-अ (कनिष्ठ)व त्यापुढील पदे |
| | **(२२)** अधीक्षक, निरीक्षक प्रमाणित शाळा व संस्था, रचना व कार्यपद्धती अधिकारी, गट-ब, महिला व बाल विकास आयुक्तालय आणि बाल विकास प्रकल्प अधिकारी (ग्रामीण) गट-ब, एकात्मिक बाल विकास सेवा योजना | S-१५ : रूपये ४१८००-१३२३०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते. | महाराष्ट्रात कोठेही | महिला व बालविकास अधिकारी (उप मुख्य कार्यकारी अधिकारी) (बालकल्याण) व त्यापुढील पदे |
| | **(२३)** सहायक गट विकास अधिकारी, गट-ब | S-१५ : रूपये ४१८००-१३२३०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते. | महाराष्ट्रात कोठेही | महाराष्ट्र विकास सेवा, गट-अ व निवडश्रेणीत |
| | **(२४)** मुख्याधिकारी, नगरपालिका/नगर परिषद,गट- ब | S-१५ : रूपये ४१८००-१३२३०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते. | नगरपालिका/नगर परिषद क्षेत्रात | मुख्याधिकारी नगरपालिका / नगर परिषद,गट -अ व त्यापुढील पदे |
| | **(२५)** सहायक निबंधक सहकारी संस्था, गट-ब | S-१५ : रूपये ४१८००-१३२३०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते. | महाराष्ट्रात कोठेही | उपनिबंधक सहकारी संस्था व त्यापुढील पदे |
| | **(२६)** उप अधीक्षक, भूमि अभिलेख, गट-ब | S-१५ : रूपये ४१८००-१३२३०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते. | महाराष्ट्रात कोठेही | जिल्हा अधीक्षक,भूमी अभिलेख,गट -अ व त्यापुढील पदे |
| | **(२७)** उपअधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, गट-ब | S-१५ : रूपये ४१८००-१३२३०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते. | महाराष्ट्रात कोठेही | अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, गट-अ व त्यापुढील पदे |
| | **(२८)** सहायक आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, गट-ब | S-१५ : रूपये ४१८००-१३२३०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते. | महाराष्ट्रात कोठेही | उपायुक्त (कनिष्ठ) राज्य उत्पादन शुल्क, गट -अ व त्यापुढील पदे |
| | **(२९)** कौशल्य विकास,रोजगार व उद्योजकता-मार्गदर्शन अधिकारी, गट-ब | S-१५ : रूपये ४१८००-१३२३०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते. | महाराष्ट्रात कोठेही | सहायक संचालक कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता,गट-अ व त्यापुढील पदे |
| | **(३०)** उद्योग अधिकारी,तांत्रिक, गट-ब | S-१५ : रूपये ४१८००-१३२३०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते. | महाराष्ट्रात कोठेही | उद्योग उपसंचालक व त्यापुढील पदे |
| | **(३१)** सरकारी कामगार अधिकारी, गट - ब | S-१५ : रूपये ४१८००-१३२३०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते. | महाराष्ट्रात कोठेही | सहायक कामगार आयुक्त व त्यापुढील पदे |
| | **(३२)** सहायक प्रकल्प अधिकारी/ सांख्यिकी अधिकारी/ प्रशासकीय अधिकारी/ संशोधन अधिकारी / गृहप्रमुख /प्रबंधक, गट-ब | S-१५ : रूपये ४१८००-१३२३०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते. | महाराष्ट्रात कोठेही | प्रकल्प अधिकारी (एकात्मिक अदिवासी विकास प्रकल्प) (श्रेणी दोन)/सहायक आयुक्त |
| | **(३३)** सहायक प्रकल्प अधिकारी (शिक्षण), गट-ब | S-१५ : रूपये ४१८००-१३२३०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते | महाराष्ट्रात कोठेही | सहायक आयुक्त व त्यापुढील पदे |
| | **(३४)** नायब तहसिलदार, गट-ब | S-१४ : रूपये ३८६००-१२२८००अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते. | महाराष्ट्रात कोठेही | तहसिलदार,गट-अ व त्यापुढील पदे |
| | **(३५)** सहायक नियंत्रक शिधावाटप, सर्वसाधारण राज्य सेवा, गट-ब | S-१५ : रूपये ४१८००-१३२३०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते. | महाराष्ट्रात कोठेही | उपनियंत्रक व त्यापुढील पदे |
| | **(३६)** निरीक्षण अधिकारी(पुरवठा), गट-ब | S-१४ : रूपये ३८६००-१२२८००अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते. | महाराष्ट्रात कोठेही | सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी, गट-ब |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **(दोन)** | **जलसंपदा विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग तसेच मृद व जलसंधारण विभाग : स्थापत्य अभियांत्रिकी सेवा :-** | | | |
| (१) | सहायक कार्यकारी अभियंता, गट-अ, स्थापत्य | S-२० : रूपये ५६१००-१७७५०० अधिक महागाई भत्ता व नियमानुसार देय इतर भत्ते. | महाराष्ट्रात कोठेही | ज्येष्ठता व पात्रतेनुसार उच्च कार्यकारी व प्रशासकीय पदावर महाराष्ट्रात कोठेही |
| (२) | सहायक अभियंता, गट-अ, स्थापत्य | S-२० : रूपये ५६१००-१७७५०० अधिक महागाई भत्ता व नियमानुसार देय इतर भत्ते. | | |
| (३) | सहायक अभियंता, गट-ब, स्थापत्य, श्रेणी-२ | S-१५ : रूपये ४१८००-१३२३०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय इतर भत्ते. | | |
| (४) | उप विभागीय जलसंधारण अधिकारी, स्थापत्य, गट - अ | S-२० : रूपये ५६१००-१७७५०० अधिक महागाई भत्ता व नियमानुसार देय इतर भत्ते. | | |
| (५) | जलसंधारण अधिकारी स्थापत्य, गट-ब | S-१६ : रूपये ४४९००-१४२४०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय इतर भत्ते. | | |
| **(तीन)** | **जलसंपदा विभाग तसेच पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग : यांत्रिकी अभियांत्रिकी सेवा :-** | | | |
| | सहायक अभियंता, यांत्रिकी, गट-ब, श्रेणी-२ | S-१५ : रूपये ४१८००-१३२३०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय इतर भत्ते. | महाराष्ट्रात कोठेही | ज्येष्ठता व पात्रतेनुसार उच्च कार्यकारी व प्रशासकीय पदावर |
| **(चार)** | **सार्वजनिक बांधकाम विभाग : विद्युत अभियांत्रिकी सेवा :-** | | | |
| | सहायक अभियंता, विद्युत, गट- ब, श्रेणी-२ | S-१५ : रूपये ४१८००-१३२३०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय इतर भत्ते. | महाराष्ट्रात कोठेही | ज्येष्ठता व पात्रतेनुसार उच्च कार्यकारी व प्रशासकीय पदावर |
| **(पाच)** | **जलसंपदा विभाग : विद्युत व यांत्रिकी अभियांत्रिकी सेवा :-** | | | |
| | सहायक अभियंता, विद्युत व यांत्रिकी, गट- ब, श्रेणी-२ | S-१५ : ४१८००-१३२३०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय इतर भत्ते. | महाराष्ट्रात कोठेही | ज्येष्ठता व पात्रतेनुसार उच्च कार्यकारी व प्रशासकीय पदावर |
| **(सहा)** | **कृषि, पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग : महाराष्ट्र कृषि सेवा :-** | | | |
| (१) | कृषि अधिकारी,गट अ | S-२० : रूपये ५६१००-१७७५०० अधिक महागाई भत्ता व नियमानुसार देय इतर भत्ते. | महाराष्ट्रात कोठेही | ज्येष्ठता व पात्रतेनुसार उच्च कार्यकारी व प्रशासकीय पदावर |
| (२) | कृषि अधिकारी, गट ब | S-१६ : रूपये ४४९००-१४२४०० अधिक महागाई भत्ता व नियमानुसार देय इतर भत्ते. | | |
| (३) | कृषि अधिकारी,गट ब कनिष्ठ | S-१५ : रूपये ४१८००-१३२३००अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय इतर भत्ते. | | |
| **(सात)** | **महसूल व वन विभाग : महाराष्ट्र वनसेवा :-** | | | |
| (१) | सहायक वनसंरक्षक, गट-अ | S-१८ : रूपये ४९१००-१५५८०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय इतर भत्ते. | महाराष्ट्रात कोठेही | ज्येष्ठता व पात्रतेनुसार महाराष्ट्र वनसेवेतील वरिष्ठ पदावर |
| (२) | वनक्षेत्रपाल, गट-ब | S-१५ : रूपये ४१८००-१३२३०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय इतर भत्ते. | | |
| **(आठ)** | **वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग : अन्न व औषध प्रशासकीय सेवा :-** | | | |
| (१) | सहायक आयुक्त, अन्न तथा पदनिर्देशित अधिकारी, गट-अ | S-२० : रूपये ५६१००-१७७५०० अधिक महागाई भत्ता व नियमानुसार देय इतर भत्ते. | महाराष्ट्रात कोठेही | सह आयुक्त (अन्न) व त्यापुढील पदावर |
| (२) | अन्न सुरक्षा अधिकारी, गट-ब | S-१५ : रूपये ४१८००-१३२३०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय इतर भत्ते. | महाराष्ट्रात कोठेही | सहायक आयुक्त, (अन्न) व त्यापुढील पदावर |
| **(नऊ)** | **महसूल व वन विभाग : महाराष्ट्र पशुवैद्यकीय सेवा :-** | | | |
| (१) | पशुवैद्यकीय अधिकारी, गट-अ | S-२० : रूपये ५६१००-१७७५०० अधिक महागाई भत्ता व नियमानुसार देय इतर भत्ते. | महाराष्ट्रात कोठेही | सहायक आयुक्त पशुसंवर्धन (वन्यजीव) व त्यापुढील पदावर |
| **(दहा)** | **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग :** | | | |
| | **निरीक्षक, वैधमापन शास्त्र, गट-ब** | S -१४ : रूपये ३८६००-१२२८०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय इतर भत्ते. | महाराष्ट्रात कोठेही | सहायक नियंत्रक वैधमापनशास्त्र व त्यापुढील पदे |

**१.२** वेतनश्रेणीमध्ये शासनाच्या धोरणानुसार बदल होण्याची शक्यता आहे.

**१.३** शासनाकडून प्राप्त मागणीनुसार भरावयाच्या संवर्गाचा व सेवेचा तपशील, पदसंख्या, आरक्षण, अर्हता, इत्यादी बाबी जाहिरात / अधिसूचनेद्वारे उमेदवारांना उपलब्ध करून देण्यात येतील.

१.४ जाहिरात प्रसिध्द झाल्यानंतर तसेच पूर्व परीक्षेचा निकाल अंतिम करेपर्यंत नव्याने प्राप्त होणा-या मागणीपत्रांमध्ये जाहिरातीत नमूद नसलेल्या सेवा व संवर्गासाठी तसेच सामाजिक आणि समांतर आरक्षणाकरीता पदे उपलब्ध होण्याची आणि विद्यमान सेवेतील व संवर्गातील पदसंख्येमध्ये बदल/वाढ होण्याची शक्यता विचारात घेऊन उमेदवारांनी पूर्व परीक्षेकरीता अर्ज सादर करणे आवश्यक राहील. पूर्व परीक्षेचा निकाल अंतिम करेपर्यंतच्या कालावधीपर्यंत शासनाकडून सुधारित/अतिरिक्त/स्वतंत्र मागणीपत्राद्वारे प्राप्त होणारी सर्व सेवेतील पदे पूर्व परीक्षेच्या निकालासाठी विचारात घेण्यात येतील.

१.५ पूर्व परीक्षेची जाहिरात प्रसिद्ध झाल्यानंतर शासनाकडून सुधारित/अतिरिक्त/स्वतंत्र मागणीपत्राद्वारे प्राप्त संवर्ग व सेवेतील पदांचा समावेश पूर्व परीक्षेच्या निकालापूर्वी शुद्धिपत्रकाद्वारे करण्यात येईल. यास्तव पूर्व परीक्षेच्या जाहिरातीमध्ये पद आरक्षित नसल्यामुळे, पदसंख्या कमी असल्यामुळे अथवा सेवा व संवर्गाचा समावेश नसल्यामुळे पूर्व परीक्षेसाठी अर्ज सादर केला नसल्याची व त्यामुळे निवडीची संधी वाया गेल्याबाबतची कोणतीहीतक्रार नंतर कोणत्याही टप्प्यावर विचारात घेतली जाणार नाही.

१.६ जाहिरात प्रसिद्ध झाल्यानंतर पूर्व परीक्षेच्या निकालापूर्वी प्रस्तुत परीक्षा योजनेतील सेवांपैकी नवीन सेवेसाठी शासनाकडून मागणीपत्र प्राप्त झाल्यास सदर सेवेचा समावेश करताना देण्यात येणाऱ्या शुद्धिपत्रकानुसार मूळ जाहिरातीस अनुसरून अर्ज सादर केलेल्या संबंधित सेवेसाठी पात्र उमेदवारांकडून सेवेचा विकल्प घेण्यात येईल. **तसेच महाराष्ट्र वनसेवा परीक्षेच्याबाबतीत पात्रतेनुसार सेवेचा विकल्प आणि मुख्य परीक्षेकरीता वैकल्पिक विषयांची निवड आणि उत्तरे लिहिण्याचे माध्यम देखिल सदर शुद्धिपत्रकान्वये करणे आवश्यक राहील.** नव्याने समाविष्ट केलेल्या सेवेबाबत विकल्प सादर न केल्यास पूर्व परीक्षेकरीता अर्ज करताना दिलेला विकल्प अंतिम समजण्यात येईल व अशा उमेदवारांचा नव्याने समाविष्ट केलेल्या सेवेकरीता विचार केला जाणार नाही.

## २. परीक्षा पद्धती :-

**२.१** विविध संवर्गाकरीता भरतीप्रक्रिया खालील तीन टप्प्यांमध्ये राबविण्यात येईल :-

(१) संयुक्त पूर्व परीक्षा

(२) सेवा/संवर्गनिहाय स्वतंत्र/एकत्रित मुख्य परीक्षा

(३) मुलाखत

**२.२** प्रस्तुत परीक्षेमधून भरावयाच्या सर्व सेवा व संवर्गातील पदभरतीकरीता एकच संयुक्त पूर्व परीक्षा घेण्यात येईल.

**२.३** ज्या सेवा व संवर्गाच्या पदभरतीसाठी शासनाकडून मागणीपत्र प्राप्त झाले आहे; त्या सेवा व संवर्गाची पदे जाहिरातीमध्ये नमूद करण्यात येतील .

**२.४** संयुक्त पूर्व परीक्षेच्या जाहिरातीस अनुसरून, अर्ज करणाऱ्या उमेदवारांकडून त्यांच्या अर्हतेच्या आधारे ते जाहिरातीमध्ये नमूद एक किंवा त्यापेक्षा जास्त संवर्गासाठी व सेवेसाठी बसू इच्छितात किंवा कसे याबाबत विकल्प (Option) घेण्यात येईल.

**२.५** जाहिरातीस अनुसरून आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे एखाद्या आणि अथवा सर्व संवर्ग व सेवेकरीता उमेदवाराने दिलेला/ले विकल्प हा/हे संबंधित सेवा व संवर्गाच्या पदभरतीकरीता अर्ज समजण्यात येईल/येतील.

**२.६** संयुक्त पूर्व परीक्षेसाठी अर्ज सादर करताना संवर्गासाठी व सेवेसाठी दिलेला/ले विकल्प अंतिम समजण्यात येईल तसेच प्रस्तुत विकल्प/माहितीच्या आधारेच पुढील भरती प्रक्रियेकरीता पात्रता आजमाविण्यात येईल.

**२.७** संयुक्त पूर्व परीक्षेकरीता दिलेला विकल्प तसेच, संबंधित संवर्गाच्या व सेवेच्या परीक्षेमधून भरावयाच्या पदसंख्येच्या आधारे, मुख्य परीक्षेसाठी पात्र करावयाच्या उमेदवारांची संख्या निश्चित करुन, सामाईक पूर्व परीक्षेमधील गुणांच्या आधारे प्रत्येक सेवानिहाय स्वतंत्र निकाल जाहीर करण्यात येईल.

**२.८** संयुक्त पूर्व परीक्षेच्या निकालाच्या आधारे संबंधित संवर्ग व सेवेकरीता घेण्यात येणा-या मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरणा-या उमेदवारांची स्वतंत्र मुख्य परीक्षा घेण्यात येईल.

**२.९** आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केलेल्या सेवानिहाय परीक्षा योजना व अभ्यासक्रमाच्या आधारे प्रत्येक सेवेकरीता खालीलप्रमाणे स्वतंत्र मुख्य परीक्षा घेण्यात येईल :-

| अ.क्र. | परीक्षेचे नांव |
|---|---|
| (१) | राज्य सेवा मुख्य परीक्षा |
| (२) | महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा |
| (३) | महाराष्ट्र यांत्रिकी अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा |
| (४) | महाराष्ट्र विद्युत अभियांत्रिकी सेवा/ महाराष्ट्र विद्युत व यांत्रिकी अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा |
| (५) | महाराष्ट्र कृषि सेवा मुख्य परीक्षा |
| (६) | महाराष्ट्र वन सेवा मुख्य परीक्षा |
| (७) | अन्न व औषध प्रशासकीय सेवा मुख्य परीक्षा |
| (८) | महाराष्ट्र पशुवैद्यकीय सेवा मुख्य परीक्षा |
| (९) | निरीक्षक वैधमापनशास्त्र, गट-ब मुख्य परीक्षा |

**२.१० महाराष्ट्र विद्युत अभियांत्रिकी सेवा/महाराष्ट्र विद्युत व यांत्रिकी अभियांत्रिकी सेवा परीक्षा** करीता अभ्यासक्रम समान असल्याने दोन्ही परीक्षा एकाचवेळी एकाच प्रश्नपत्रिकेनुसार होणार आहेत. तथापि प्रस्तुत दोन्ही मुख्य परीक्षांसाठी स्वतंत्र जाहिरात प्रसिद्ध करून पात्र उमेदवारांकडून स्वतंत्र अर्ज स्विकारण्यात येतील. या दोन्ही संवर्गांकरीता एकच संयुक्त मुख्य परीक्षा घेऊन दोन्ही सेवांकरीता स्वतंत्र निकालाच्या आधारे भरतीप्रक्रिया राबविण्यात येईल

२.११ मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी उमेदवारांची संख्या विहित मर्यादेत सिमित करण्यासाठी पूर्व परीक्षा घेण्यात येते. पूर्व परीक्षेसाठी आयोगाने विहित केलेल्या गुणांची किमान सीमारेषा किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणा-या उमेदवारांस मुख्य परीक्षेसाठी पात्र समजण्यात येते.

२.१२ पूर्व परीक्षेचे गुण अंतिम निवडीच्या वेळी विचारात घेतले जाणार नाहीत.

२.१३ संयुक्त पूर्व परीक्षेसाठी अर्ज सादर करताना दिलेला/ले विकल्प व अर्जामध्ये नमूद माहिती यामध्ये बदल करण्याबाबतची विनंती कोणत्याही परिस्थितीत नंतरच्या टप्प्यावर मान्य करण्यात येणार नाही.

२.१४ जाहिरातीस अनुसरून पूर्व परीक्षेकरीता अर्जाद्वारे केलेल्या विविध दाव्यांच्या अनुषंगाने कोणत्याही टप्प्यावर कागदपत्रे/पुरावा सादर करणे अनिवार्य आहे. अन्यथा आयोगाच्या सूचनांचे उल्लंघन तसेच आयोगाची फसवणुक समजून आयोगाच्या स्वेच्छाधिकारानुसार संबधितांवर कारवाई करण्यात येईल

**३.पात्रता :-**

**३.१** भारतीय नागरिकत्व

**३.२ वयोमर्यादा :-**

**३.२.१ वयोमर्यादा गणण्याचा दिनांक :- जाहिरातीमध्ये नमूद केल्याप्रमाणे राहील.**

**३.२.२ विविध संवर्ग तसेच आरक्षित प्रवर्गासाठी किमान/कमाल वयोमर्यादा खालीलप्रमाणे आहे:-**

| अ.क्र. | वयोमर्यादा गणण्याचा दिनांक | वय | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | किमान | कमाल | | प्राविण्य प्राप्त खेळाडू | | माजी सैनिक, आणिबाणी व अल्पसेवा राजादिष्ट अधिकारी | | दिव्यांग उमेदवार |
| | | अमागास / मागासवर्गीय /आ. दु. घ. | अमागास | मागासवर्गीय /अनाथ/ आ. दु. घ. | अमागास | मागासवर्गीय/ आ. दु. घ. | अमागास | मागासवर्गीय/ आ. दु. घ. | |
| (१) | राज्य सेवा मुख्य परीक्षा | १९ | ३८ | ४३ | ४३ | ४३ | ४३ | ४३ | वयाच्या ४५ वर्षापर्यंत |
| (२) | महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा | १९ | ३८ | ४३ | ४३ | ४३ | ४३ | ४३ | वयाच्या ४५ वर्षापर्यंत |
| (३) | महाराष्ट्र यांत्रिकी अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा | १९ | ३८ | ४३ | ४३ | ४३ | ४३ | ४३ | वयाच्या ४५ वर्षापर्यंत |
| (४) | महाराष्ट्र विद्युत अभियांत्रिकी सेवा/ महाराष्ट्र विद्युत व यांत्रिकी अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा | १९ | ३८ | ४३ | ४३ | ४३ | ४३ | ४३ | वयाच्या ४५ वर्षापर्यंत |
| (५) | महाराष्ट्र कृषि सेवा मुख्य परीक्षा | १८ | ३८ | ४३ | ४३ | ४३ | ४३ | ४३ | वयाच्या ४५ वर्षापर्यंत |
| (६) | महाराष्ट्र वन सेवा मुख्य परीक्षा | | | | | | | | |
| | (१) सहायक वनसंरक्षक, गट-अ | १८ | ३८ | ४३ | ४३ | ४३ | ४३ | ४३ | अपात्र |
| | (२) वनक्षेत्रपाल, गट-ब | २१ | ३८ | ४३ | ४३ | ४३ | ४३ | ४३ | अपात्र |
| (७) | अन्न व औषध प्रशासकीय सेवा मुख्य परीक्षा | १९ | ३८ | ४३ | ४३ | ४३ | ४३ | ४३ | वयाच्या ४५ वर्षापर्यंत |
| (८) | महाराष्ट्र पशुवैद्यकीय सेवा मुख्य परीक्षा | १८ | ३८ | ४३ | ४३ | ४३ | ४३ | ४३ | वयाच्या ४५ वर्षापर्यंत |
| (९) | निरीक्षक वैधमापनशास्त्र, गट-ब मुख्य परीक्षा | १९ | ३८ | ४३ | ४३ | ४३ | ४३ | ४३ | वयाच्या ४५ वर्षापर्यंत |

**३.२.३** विहित वयोमर्यादा इतर कोणत्याही बाबतीत शिथिल करण्यात येणार नाही.

**३.३ अर्हता :-**

**३.३.१ शैक्षणिक अर्हता :-**

**३.३.१.१ राज्य सेवा परीक्षा :-**

**(एक)** खालील परिच्छेदामध्ये नमूद काही विशिष्ट संवर्ग वगळता इतर सर्व संवर्गाकरीता मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी किंवा महाराष्ट्र शासनाने पदवीस समतुल्य म्हणून मान्य केलेली विहित अर्हता

**(दोन)** खालील विशिष्ट संवर्गाकरीता शैक्षणिक अर्हता त्यांच्या समोर दर्शविल्याप्रमाणे राहील :-

| अ.क्र. | संवर्ग | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|
| **(१)** | सहायक संचालक, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, गट -अ | (१) सांविधिक विदयापीठाची, किमान ५५ टक्क्यांसह वाणिज्य शाखेची स्नातक पदवी, किंवा<br>(२) इन्स्टिटयुट ऑफ चार्टर्ड अकांऊटस ऑफ इंडिया यांनी घेतलेली सनदी लेखापालाची अंतिम परीक्षा उत्तीर्ण किंवा<br>(३) इन्स्टिटयुट ऑफ कॉस्ट ॲण्ड वर्क्स अकांऊटस यांनी आयोजित केलेली परिव्यय लेखाशास्त्राची अंतिम परीक्षा उत्तीर्ण किंवा |
| **(२)** | लेखाधिकारी, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, गट-ब | |

| | | |
|---|---|---|
| | | (४) सांविधिक विद्यापीठाची वाणिज्य मधील पदव्युत्तर पदवी, किंवा<br>(५) अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मान्यताप्राप्त संस्थेमधून वित्त व्यवसाय प्रशासन या विशेषज्ञतेसह पदव्युत्तर पदवी (एम.बी.ए). |
| (३) | सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, गट-अ | (१) यांत्रिकी किंवा स्वयंचलित्र (ऑटोमोबाईल) अभियांत्रिकीमधील किमान ४ वर्षांची पदवी<br>(२) मुख्य परीक्षेचा अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या तारखेला, गिअर्स, हलकी मोटार वाहने आणि परिवहन वाहने (अवजड मालवाहू वाहने व अवजड प्रवासी वाहने) यांसह मोटार सायकल चालविण्यासाठी प्राधिकृत करणा-या सक्षम प्राधिकरणाने दिलेले वाहन चालविण्याचे वैध लायसन आवश्यक.<br>(३) मुख्य परीक्षेचा अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या तारखेला, अवजड मालवाहू वाहने किंवा यथास्थिती, अवजड प्रवासी वाहने, अथवा अवजड मालवाहू वाहने व अवजड प्रवासी वाहने ही दोन्ही वाहने चालविण्याचे वैध लायसन धारण करीत नसेल तर, परिवीक्षा कालावधी पूर्ण होण्यापूर्वी असे वाहन चालविण्याचे लायसन प्राप्त करणे अनिवार्य. अन्यथा सेवा समाप्त करण्यास पात्र असेल.<br>(४) कोणताही खंड न पडता वाहन चालविण्याच्या लायसनचे वेळोवेळी नुतनीकरण करणे आवश्यक राहील. |
| **(४)** | उद्योग उप संचालक, तांत्रिक, गट-अ | (१) सांविधिक विदयापीठाची अभियांत्रिकी मधील पदवी (स्थापत्य अभियांत्रिकी तसेच स्थापत्य अभियांत्रिकी मधील विषयांच्या गटांशी संलग्न असलेल्या वास्तुविद्या, नगररचना इत्यादी विषयांव्यतिरिक्त) किंवा तंत्रज्ञानामधील पदवी किंवा<br>(२) विज्ञान शाखेतील सांविधिक विद्यापीठाची पदवी. |
| **(५)** | उद्योग अधिकारी, तांत्रिक, गट-ब | |

**३.३.१.२ स्थापत्य अभियांत्रिकी सेवा परीक्षा :-**

**(१)** मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रिकी मधील पदवी किंवा महाराष्ट्र शासनाने त्या पदवीशी समतुल्य असल्याचे घोषित केलेली तत्सम अर्हता.

**(२)** शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक संकिर्ण-२०१३/(४५/१३)/भाग-१/तांशि-२, दिनांक १८ ऑक्टोबर, २०१६ नुसार खालील शैक्षणिक अर्हता स्थापत्य अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाशी समतुल्य आहेत:-

**(अ)** B.E. / B. Tech.(Civil and Water Management) **(ब)** B.E. / B. Tech. (Civil and Environmental)
**(क)** B.E./ B. Tech. (Structural) **(ड)** B.E./ B. Tech. (Construction Engineering/Technology)

**३.३.१.३ यांत्रिकी अभियांत्रिकी सेवा परीक्षा :-**

**(१)** मान्यताप्राप्त विद्यापीठाची यंत्र अभियांत्रिकी मधील पदवी किंवा महाराष्ट्र शासनाने त्या पदवीशी समतुल्य असल्याचे घोषित केलेली तत्सम अर्हता.

**(२)** शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक संकिर्ण-२०१३/(४५/१३)/भाग-१/तांशि-२, दिनांक १८ ऑक्टोबर, २०१६ नुसार खालील अर्हता यंत्र अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाशी समतुल्य आहेत:-

**(अ)** B.E./B. Tech.(Automobile), **(ब)** B.E./ B. Tech.(Production) , **(क)** B.E./ B. Tech.(Industrtial)

**३.३.१.४ विद्युत अभियांत्रिकी सेवा परीक्षा :-**

**(१)** मान्यताप्राप्त विद्यापीठाची विद्युत अभियांत्रिकीमधील पदवी किंवा महाराष्ट्र शासनाने त्या पदवीशी समतुल्य असल्याचे घोषित केलेली तत्सम अर्हता.

**(२)** शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक संकिर्ण-२०१३/(४५/१३)/भाग-१/तांशि-२, दिनांक १८ ऑक्टोबर, २०१६ नुसार खालील अर्हता विद्युत अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाशी समतुल्य आहेत:-

**(अ)** B.E./B. Tech. (Electrical and Power) **(ब)** B.E./ B. Tech. (Electronics and Power)
**(क)** B.E./ B. Tech. (Power System) **(ड)** B.E./ B. Tech. (Electrical and Electronics)

**३.३.१.५ विद्युत व यांत्रिकी अभियांत्रिकी सेवा परीक्षा :-**

**(१)** मान्यताप्राप्त विद्यापीठातील विद्युत अभियांत्रिकी किंवा विद्युत व यांत्रिकी अभियांत्रिकी मधील पदवी किंवा महाराष्ट्र शासनाने त्या पदवीशी समतुल्य असल्याचे घोषित केलेली तत्सम अर्हता.

**(२)** शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक संकिर्ण-२०१३/(४५/१३)/भाग-१/तांशि-२, दिनांक १८ ऑक्टोबर, २०१६ नुसार खालील अर्हता विद्युत अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाशी समतुल्य आहेत:-

**(अ)** B.E./B. Tech. (Electrical and Power) **(ब)** B.E./ B. Tech. (Electronics and Power)
**(क)** B.E./ B. Tech. (Power System) **(ड)** B.E./ B. Tech. (Electrical and Electronics)

**३.३.१.६ कृषि सेवा परीक्षा :-**

**(१)** मान्यताप्राप्त संस्थेकडून कृषि किंवा कृषि अभियांत्रिकी अथवा उद्यानविद्या या विषयातील पदवी किंवा त्याच विद्याशाखेतील अन्य कोणतीही समतुल्य अर्हता.

**(२)** प्रस्तुत भरतीकरीता शासन निर्णय, कृषि, पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, क्रमांक : आकृवि-१२११/प्रक्र २०८/१५ए, दिनांक ७ सप्टेंबर, २०११ तसेच क्रमांक: मकृप १०२१/प्र.क्र.६३/७ अ, दिनांक २२ एप्रिल, २०२१ अन्वये खालील शैक्षणिक अर्हता अनुक्रमे बी.एसस्सी (कृषि)/बी.टेक (कृषि अभियांत्रिकी) व बी. एससी (ऑनर्स) कृषि पदव्यांशी समतुल्य म्हणून मान्य केल्या आहेत:-

बी.एसस्सी (कृषि जैव तंत्रज्ञान), बी.एसस्सी (कृषि व्यवसाय व्यवस्थापन), बी.एसस्सी (गृह विज्ञान), बी.टेक (अन्नतंत्र), बी.एफ.एसस्सी., बी.एसस्सी (उद्यानविद्या) , बी. एससी (ऑनर्स) उद्यानविद्या, बी. एससी (ऑनर्स) वनविद्या, बी. एससी (ऑनर्स) सामाजिक विज्ञान, बी. एफ.एससी (मत्स्य विज्ञान), बी. टेक (कृषि अभियांत्रिकी), बी. टेक (अन्नतंत्रज्ञान), बी. टेक (जैवतंत्रज्ञान), बी. एससी. (एबीएम)/ बी. बी. एम (कृषि)/ बी. बी. ए.(कृषि)/ बी. एससी (ऑनर्स) कृषि व्यवसाय व्यवस्थापन,बी.एससी (वनशास्त्र)

(३) शासनाच्या, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, क्रमांक कृषिआ-१२२५/प्र.क्र.२०/१५-अे, दिनांक १६ मे, २०२५ व ०७ ऑगस्ट, २०२५ रोजीच्या पत्रानुसार **राज्यातील चार कृषि विद्यापीठाव्यतिरिक्त इतर अकृषि विद्यापीठे/भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांची मान्यता नसलेली विद्यापीठांकडून** प्रदान करण्यात आलेल्या पदव्या, समतुल्य शैक्षणिक अर्हता म्हणून ग्राह्य समजण्यात येणार नाहीत

### ३.३.१.७ महाराष्ट्र वनसेवा परीक्षा :-

| | |
|---|---|
| (१) सहायक वनसंरक्षक, गट-अ | **(एक)** खालील विषयांपैकी कमीत कमी एका विषयाची मान्यताप्राप्त विद्यापिठाची पदवी **:-**<br>**(१)** वनस्पतीशास्त्र **(२)** रसायनशास्त्र **(३)** वनशास्त्र **(४)** भूशास्त्र **(५)** गणित **(६)** भौतिकशास्त्र **(७)** सांख्यिकी **(८)** प्राणिशास्त्र **(९)**उद्यानविद्या (१०) पशुसंवर्धन व पशुवैद्यकशास्त्र किंवा<br>**(दोन)** कृषि, अभियांत्रिकी, यातील स्नातक पदवीधर |
| (२) वनक्षेत्रपाल, गट-ब | **(एक)** वनस्पतीशास्त्र, रसायनशास्त्र, वनशास्त्र, भूशास्त्र, गणित, भौतिकशास्त्र, सांख्यिकी, प्राणिशास्त्र, उद्यानविद्या शास्त्र, कृषी शास्त्र, कृषी अभियांत्रिकी,रसायन अभियांत्रिकी, स्थापत्य अभियांत्रिकी, संगणक अभियांत्रिकी, विद्युत अभियांत्रिकी, इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी, यंत्र अभियांत्रिकी, संगणक ॲप्लिकेशन, संगणक विज्ञान, पर्यावरणीय विज्ञान, पशुवैद्यकीय विज्ञान यांपैकी कोणत्याही विषयातील सांविधिक विदयापीठाची विज्ञान शाखेची पदवी किंवा<br>(दोन) विज्ञान शाखेव्यतिरिक्त इतर शाखेतील गणित विषयासह पदवीधारक.<br>(तीन) विज्ञान शाखेव्यतिरिक्त इतर शाखेतील गणित विषयासह पदवीधारक उमेदवाराने विज्ञान शाखेतील उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.<br>**(चार)** शासन पत्र, महसूल व वन विभाग, क्रमांक एफएसटी-०२/१५/प्र.क्र.४६/फ-४, दिनांक ११ फेब्रुवारी, २०१६ नुसार इलेक्ट्रॉनिक्स आणि टेलि कम्युनिकेशन अभियांत्रिकी तसेच संगणक विज्ञान व तंत्रज्ञान अभियांत्रिकी अशी अर्हता धारण करणारे उमेदवार वनक्षेत्रपाल पदासाठी अर्ज करण्यास पात्र राहतील.<br>**(पाच)** शासन पत्र, महसूल व वन विभाग, क्रमांक : एफएसटी-०९/१८/प्र.क्र.३६६/फ-४, दिनांक ८ सप्टेंबर, २०२१ अन्वये प्राप्त अभिप्रायानुसार खालील विद्याशाखेतील पदवीधर उमेदवार पदवीमध्ये गणित विषय घेवून उत्तीर्ण झाले असल्यास व उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा विज्ञान शाखेत असल्यास वनक्षेत्रपाल संवर्ग/पदासाठी पात्र असतील :-<br>(१) BE/B.Tech. Automobile Engineering (२) BE/B.Tech. Power<br>(३) BE/B.Tech. Production (४) BE/B.Tech. Metallurgy and Material<br>(५) BE/B.Tech. Textile (६) BE- Information Technology<br>(७) BE- Instrumentation (८) B.Sc. - Biotechnology<br>(९) B. Pharmacy (१०) B.Tech. - Food Science<br>**(सहा) वनशास्त्र पदवी प्रवर्गाकरीता आरक्षित असलेल्या** वनक्षेत्रपाल पदांकरीता वनशास्त्र पदवीधारक उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पद परिच्छेद क्रमांक **३.३.१.७(२) मधील क्रमांक एक ते पाच मध्ये** नमूद अर्हता धारकामधून भरण्यात येईल. |

### ३.३.१.८ अन्न व औषध प्रशासकीय सेवा परीक्षा :-

**(१) सहायक आयुक्त अन्न, गट-अ संवर्गाकरीता :-**

**(१)** रसायनशास्त्र विषयासह विज्ञान शाखेतील मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी किंवा पदव्युत्तर पदवी किंवा डॉक्टरेट पदवी किंवा अन्न तंत्रज्ञान किंवा डेअरी तंत्रज्ञान किंवा जैव तंत्रज्ञान किंवा तेल तंत्रज्ञान किंवा कृषी शास्त्र किंवा पशु वैद्यकीय शास्त्र किंवा जैव रसायन किंवा सुक्ष्मजीवशास्त्र किंवा रसायन शास्त्र किंवा वैद्यकशास्त्र (M.B.B.S.) या विषयातील मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी किंवा पदव्युत्तर पदवी किंवा डॉक्टरेट .

**(२)** शासन पत्र, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, क्रमांक एफडीएस-२०२०/प्र.क्र.१०५/२०/औषधे-१, दिनांक १८ एप्रिल, २०२३ द्वारे शैक्षणिक अर्हतेसंदर्भात कृषि शास्त्र शाखेतील पदवीच्या अनुषंगाने प्राप्त अभिप्रायानुसार बी.एस.सी. (कृषि) अर्हता ग्राह्य समजण्यात येईल.

**किंवा**

**(३)** केंद्र शासनाच्या मान्यतेने अन्न प्राधिकरणाने अधिसूचित केलेल्या समतुल्य किंवा मान्यताप्राप्त अर्हता.

**(२) अन्न सुरक्षा अधिकारी संवर्गाकरीता :-**

(१) अन्न तंत्रज्ञान किंवा डेअरी तंत्रज्ञान किंवा जैव तंत्रज्ञान किंवा तेल तंत्रज्ञान किंवा कृषि शास्त्र किंवा पशु वैद्यकीय शास्त्र किंवा जैव रसायन किंवा सुक्ष्मजीवशास्त्र किंवा रसायन शास्त्र किंवा वैद्यकशास्त्र (M.B.B.S.) या विषयातील मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी, पदव्युत्तर पदवी किंवा डॉक्टरेट (Doctorate).

(२) शासन पत्र, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, क्रमांक एफडीएस-२०२०/प्र.क्र.१०५/२०/औषधे-१, दिनांक १८ एप्रिल, २०२३ द्वारे शैक्षणिक अर्हतेसंदर्भात कृषि शास्त्र शाखेतील पदवीच्या अनुषंगाने प्राप्त अभिप्रायानुसार बी.एस.सी. (कृषि) अर्हता ग्राह्य समजण्यात येईल.

**किंवा**

(३) केंद्र शासनाच्या मान्यतेने अन्न प्राधिकरणाने अधिसूचित केलेल्या समतुल्य किंवा मान्यताप्राप्त अर्हता.

**३.३.१.९ महाराष्ट्र पशुवैद्यकीय सेवा परीक्षा :-**

**पशुवैद्यकीय अधिकारी, गट-अ संवर्गाकरीता :-**

(१) पशुवैद्यकीय विज्ञान आणि पशुसंवर्धन स्नातक विषयातील सांविधिक विद्यापीठाची विज्ञान शाखेची पदवी

(२) महाराष्ट्र पशुवैद्यकीय व्यावसायिक अधिनियम, १९७१ (सन १९७१चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४४ अन्वये) किंवा त्यावेळी अस्तित्वात असलेल्या पशुवैद्यकीय व्यावसायिक अधिनियमान्वये नोंदणी केलेली असणे आवश्यक.

**३.३.१.१० निरीक्षक वैधमापन शास्त्र, गट-ब परीक्षा :-**

(१) सांविधिक विद्यापीठाची यात्रिकी, विद्युत, इलेक्ट्रॉनिक्स, संगणक अभियांत्रिकीमधील पदवी **किंवा** भौतिकशास्त्र विषयासह विज्ञान शाखेची पदवी

**(२)** शासन पत्र, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, क्रमांक वैमाशा-२०२१/प्र.क्र.२८/२२/ग्रासं-३, दिनांक १६ मार्च, २०२३ अन्वये प्राप्त अभिप्रायानुसार तसेच शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक संकिर्ण-२०१३/(४५/१३)/भाग-१/तांशि-२, दिनांक १८ ऑक्टोबर, २०१६ अनुसार खालील खालील समतुल्य शैक्षणिक अर्हता धारण करणारे उमेदवार निरीक्षक वैधमापन शास्त्र संवर्गाकरीता अर्ज करण्यास पात्र असतील:-

| अ.क्र. | पदवी | समतुल्य अर्हता |
|---|---|---|
| १ | यांत्रिकी अभियांत्रिकी<br>[Mechanical Engineering] | (1) Automobile Engineering , (2) Production Engineering, (3) Industrial Engineering |
| २ | विद्युत अभियांत्रिकी<br>[Electrical Engineering] | (१) Electrical and Power Engineering, (२) Electronics and power Engineering<br>(३) Power System Engineering, (४) Electrical and Electronics Engineering |
| ३ | अणुविद्युत अभियांत्रिकी<br>[Electrocnis Engineering] | (१) Digital Electronics, (२) Electronics and Telecommunication<br>(३) Electronics and communication Engineering, (४) Industrial Electronics<br>(५) Communication Engineering, (६) Electronics and power Engineering<br>(७) Electronics Technology, (८) Electronics and communication Technology<br>(९) Electronics Design Technology, (१०) Electronics Product Design |
| ४ | संगणक अभियांत्रिकी.<br>[Computer Engineering] | (१) Computer science and Engineering, (२) Computer Technology<br>(३) Information Technology, (४) Computer Science and Technology<br>(५) Computer Science and Information Technology |

**३.३.२** मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.

**३.३.३** पदवीच्या शेवटच्या वर्षाच्या परीक्षेस बसलेले उमेदवार पूर्व परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र असतील. परंतु मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी अर्हताप्राप्त ठरल्यास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी विहित पद्धतीने आवश्यक माहिती/अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत पदवी परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य राहील.

**३.३.४** अंतर्वासिता किंवा कार्यशाळेतील प्रत्यक्ष कामाचा अनुभव आवश्यक असेल अशा पदवी धारकाने शैक्षणिक अर्हतेबाबतची अट मुख्य परीक्षेची माहिती/अर्ज स्वीकारण्याच्या विहित दिनांकापर्यत पूर्ण केली असली पाहिजे.

**३.३.५ शारीरिक अर्हता :-**

**३.३.५.१ राज्य सेवा परीक्षा :-**

| अ.क्र. | संवर्गाचे नाव | पुरुष उमेदवारांकरीता | महिला उमेदवारांकरीता |
|---|---|---|---|
| (१) | पोलीस उप अधीक्षक / सहायक पोलीस आयुक्त, गट अ | उंची-१६५ सें. मी. (अनवाणी) (कमीत कमी)<br>छाती-न फुगविता ८४ से.मी.<br>फुगविण्याची क्षमता-किमान ५ से.मी. आवश्यक | उंची - १५७ सें.मी.<br>(अनवाणी) (कमीत कमी) |
| (२) | अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, गट-अ | उंची-१६५ सें. मी. (अनवाणी)(कमीत कमी)<br>छाती - न फुगविता ७९ से.मी.<br>फुगविण्याची क्षमता- किमान ५ से.मी. आवश्यक | उंची-१५५ सें.मी.<br>(अनवाणी) (कमीत कमी) |
| (३) | उपअधीक्षक राज्य उत्पादन शुल्क, गट-ब | | |
| (४) | सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, गट-अ | (१) उंची-१६३ सें. मी. पेक्षा कमी नसावी<br>(२) छाती - न फुगविता ७९ से.मी. फुगविल्यानंतर किमान ५ से.मी. वाढलेली असावी<br>(३) चष्म्यासह किंवा चष्म्याशिवाय चांगली दृष्टी आहे आणि रंग अंध नाहीत.<br>(४) "चांगली दृष्टी" याचा अर्थ चष्म्याशिवाय प्रत्येक डोळ्याचा ६/२४, सुधारल्यानंतर + २.५ सह, प्रत्येक डोळ्याचा ६/६, इशिहार चाचणीनुसार जी वर्णभेद ओळखते ती नेहमीची दृष्टी. डोळ्याच्या बाहेरील संक्रमणाची कोणतीही स्पष्ट चिन्हे, कोणताही सैल तिरळेपण नसावे. | (१) उंची-१५५ सें.मी. पेक्षा कमी नसावी<br>(२) चष्म्यासह किंवा चष्म्याशिवाय चांगली दृष्टी आहे आणि रंग अंध नाहीत.<br>(३) "चांगली दृष्टी" याचा अर्थ चष्म्याशिवाय प्रत्येक डोळ्याचा ६/२४, सुधारल्यानंतर + २.५ सह, प्रत्येक डोळ्याचा ६/६, इशिहार चाचणीनुसार जी वर्णभेद ओळखते ती नेहमीची दृष्टी. डोळ्याच्या बाहेरील संक्रमणाची कोणतीही स्पष्ट चिन्हे, कोणताही सैल तिरळेपण नसावे. |

३.३.५.२ **महाराष्ट्र वन सेवा परीक्षा :-**

| पदाचे नाव | पुरुष उमेदवारांकरीता | महिला उमेदवारांकरीता |
|---|---|---|
| **(१) सहायक वनसंरक्षक, गट-अ**<br>**(२) वनक्षेत्रपाल, गट-ब** | **(अ) अनुसूचित जमाती व्यतिरिक्त अन्य उमेदवार** | |
| | उंची - १६३ सें.मी. (अनवाणी) (कमीत कमी)<br>छाती - न फुगवता ७९ सें.मी. (कमीत कमी)<br>फुगविण्याची क्षमता- न फुगवलेली छाती व फुगवलेली छाती यातील फरक ५ सें.मी.पेक्षा कमी नसावा. | उंची - १५० सें.मी. (अनवाणी) (कमीत कमी) |
| | **(ब)अनुसूचित जमाती प्रवर्गातील उमेदवार** | |
| | उंची -१५२.५ सें.मी.(अनवाणी)(कमीत कमी)<br>छाती - न फुगवता ७९ सें.मी. (कमीत कमी)<br>फुगविण्याची क्षमता- न फुगवलेली छाती व फुगवलेली छाती यातील फरक ५ सें.मी.पेक्षा कमी नसावा. | उंची - १४५ सें.मी. (अनवाणी) (कमीत कमी) |
| | **(क)दृष्टी** :- सुधारणेनंतर (After Correction) + 4.00 D सह प्रत्येक डोळयाची दृष्टितीक्ष्णता (Visual Acuity) ६/६ असावी. बाह्य डोळयावर कोणतेही रोग संक्रमण झालेले नसावे किंवा तिरळेपणा नसावा. | |
| | **(ड) सहायक वनसंरक्षक, गट-अ करीता** पुरुष व महिला उमेदवारांची अनुक्रमे **२५** कि.मी. व **१४** कि.मी. अंतर चार तासांत चालून पूर्ण करण्याची शारिरीक क्षमता असणे आवश्यक.<br>**वनक्षेत्रपाल, गट-ब** पुरुष व महिला उमेदवारांची अनुक्रमे **२५** कि.मी. व **१६** कि.मी. अंतर चार तासांत चालून पूर्ण करण्याची शारिरीक क्षमता असणे आवश्यक. | |

**३.३.६** राज्य सेवा मुख्य परीक्षेतील विविध संवर्गाच्या मुलाखतीसाठी पात्र उमेदवारांची वैद्यकीय चाचणी मुलाखतीपूर्वी किंवा मुलाखतीनंतर प्राधिकृत वैद्यकीय मंडळाकडून आयोजित करण्यात येईल. यासंबंधीची माहिती स्वतंत्रपणे आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाईल. तसेच सदर वैद्यकीय चाचणीमध्ये त्याच्याशी संबंधित संवर्गाच्या मानक/निकषनुसार उमेदवारांची पात्रता निर्धारित केली जाईल, आणि त्यानुसार पसंतीक्रम निश्चित केला जाईल.

**३.३.७ पूर्व परीक्षेचा अर्ज सादर करतेवळी अर्जामध्ये नोंदविलेले** शारीरिक मोजमाप आणि मुख्य परीक्षेच्या अर्जातील **शैक्षणिक अर्हता/पात्रता** लक्षात घेऊन लेखी परीक्षेच्या निकालाच्या आधारावर उमेदवाराची वैद्यकीय चाचणीसाठी पात्रता ठरवली जाईल.

**३.३.८** ज्या संवर्गाकरीता शारिरीक अर्हता आवश्यक आहे, अशा पदांसाठी शिफारस केलेल्या उमेदवारांची नियुक्ती करण्यापूर्वी त्यांची शारिरिक मोजमापे शासनाच्या संबंधित विभागाद्वारे सक्षम प्राधिका-याकडून तपासून घेतली जातील.

**३.३.९** एखाद्या संवर्गाकरीता विहित/आवश्यक शारिरिक मोजमापे पूर्ण न भरल्यास उमेदवार संबंधित संवर्गामध्ये नियुक्तीसाठी अपात्र ठरेल.

**४. शुल्क (फी):-**

**४.१** प्रस्तुत परीक्षेकरीता आयोगाकडून आकारण्यात येणारे शुल्क खालीलप्रमाणे आहे:-

| अ.क्र. | परीक्षेचे नांव | परीक्षा शुल्क | |
|---|---|---|---|
| | | अमागास | मागासवर्गीय/आ.दु.घ./ अनाथ/दिव्यांग/खेळाडू |
| (१) | महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित गट-अ व गट-ब संयुक्त पूर्व परीक्षा | ₹ ५४४ /- | ₹ ३४४/- |
| (२) | राज्य सेवा मुख्य परीक्षा | ₹ ५४४ /- | ₹ ३४४/- |
| (३) | महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा | ₹ ५४४ /- | ₹ ३४४/- |
| (४) | महाराष्ट्र यांत्रिकी अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा | ₹ ५४४ /- | ₹ ३४४/- |
| (५) | महाराष्ट्र विद्युत अभियांत्रिकी सेवा/ महाराष्ट्र विद्युत व यांत्रिकी अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा | ₹ ५४४ /- | ₹ ३४४/- |
| (७) | महाराष्ट्र कृषि सेवा मुख्य परीक्षा | ₹ ५४४ /- | ₹ ३४४/- |
| (८) | महाराष्ट्र वन सेवा मुख्य परीक्षा | ₹ ५४४ /- | ₹ ३४४/- |
| (९) | अन्न व औषध प्रशासकीय सेवा मुख्य परीक्षा | ₹ ५४४ /- | ₹ ३४४/- |
| (१०) | महाराष्ट्र पशुवैद्यकीय सेवा मुख्य परीक्षा | ₹ ५४४ /- | ₹ ३४४/- |
| (११) | निरीक्षक वैधमापनशास्त्र, गट-ब मुख्य परीक्षा | ₹ ५४४ /- | ₹ ३४४/- |

४.२ विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), विशेष मागास प्रवर्ग, इतर मागास वर्ग, सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास वर्ग या प्रवर्गातील उन्नत व प्रगत गटात (क्रिमी लेयर) मोडणाऱ्या उमेदवारांना आरक्षणाचा व वयोमर्यादेचा फायदा देय नसल्याने त्यांनी अमागास उमेदवारांप्रमाणे परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

४.३ सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग अधिनियम दिनांक २६ फेब्रुवारी २०२४ व संबंधित शासन निर्णय दिनांक २७ फेब्रुवारी, २०२४ संदर्भात मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील रिट याचिका क्रमांक ३४६८/२०२४ व इतर अन्वये दाखल याचिकांवरील मा. न्यायालयाच्या न्याय निर्णयाच्या अधीन राहून भरती प्रक्रिया राबविण्यात येईल.

४.४ उन्नत व प्रगत गटासंदर्भातील (क्रिमी लेयर) उत्पन्नाची मर्यादा तसेच अन्य तद्अनुषंगिक बाबी शासनाने वेळोवेळी जारी केलेल्या आदेशानुसार राहतील

**५. परीक्षा केंद्र: -**

**५.१ संयुक्त पूर्व परीक्षा** खालील ठिकाणी घेण्यात येईल:-

| केंद्र | संकेतांक |
|---|---|
| अहिल्यानगर | ११ |
| अकोला | १२ |
| अलिबाग | १३ |
| अमरावती | १४ |
| छत्रपती संभाजी नगर | १५ |
| बीड | १६ |
| भंडारा | १७ |
| बुलढाणा | १८ |
| चंद्रपूर | १९ |
| धुळे | २० |
| गडचिरोली | २१ |
| गोंदिया | २२ |
| हिंगोली | २३ |

| केंद्र | संकेतांक |
|---|---|
| जळगाव | २४ |
| जालना | २५ |
| कोल्हापूर | २६ |
| कुडाळ | २७ |
| लातूर | २८ |
| मुंबई (मध्य) | ३० |
| मुंबई (पश्चिम) | ३१ |
| नागपूर | ३२ |
| नांदेड | ३३ |
| नंदुरबार | ३४ |
| नाशिक | ३५ |
| धाराशिव | ३६ |
| परभणी | ३७ |

| केंद्र | संकेतांक |
|---|---|
| पुणे | ३८ |
| रत्नागिरी | ३९ |
| सांगली | ४० |
| सातारा | ४१ |
| सोलापूर | ४२ |
| ठाणे | ४३ |
| वर्धा | ४४ |
| वाशिम | ४५ |
| यवतमाळ | ४६ |
| पालघर | ४७ |
| नवी मुंबई | ४८ |

५.२ मुख्य परीक्षा सर्वसाधारणपणे खालील सहा ठिकाणी घेण्यात येईल:-

| जिल्हा केंद्र | जिल्हा केंद्राचा सांकेतांक |
|---|---|
| (१)अमरावती | **१४** |
| (२)छत्रपती संभाजी नगर | **१५** |
| (३) नवी मुंबई | ४८ |

| जिल्हा केंद्र | जिल्हा केंद्राचा सांकेतांक |
|---|---|
| (४) नागपूर | **३२** |
| (५) नाशिक | **३५** |
| (६) पुणे | **३८** |

५.३ उपरोक्त जिल्हा केंद्रांमधून कोणतेही एक जिल्हा केंद्र संबंधित परीक्षेकरीता माहिती/अर्ज सादर करतानाच निवडणे आवश्यक आहे.

५.४ उपरोक्त जिल्हा केंद्रांमध्ये आवश्यकतेनुसार वेळोवेळी वाढ अथवा बदल होऊ शकतात.

५.५विहित पद्धतीने ऑनलाईन माहिती सादर करताना उमेदवाराने निवडलेले जिल्हाकेंद्र व उपलब्धतेनुसार जिल्हा केंद्रावरील विविध परीक्षा उपकेंद्रावर पात्र उमेदवारांना प्रवेश देण्यात येईल.

५.६ एखादे जिल्हा केंद्र कार्यान्वित होऊ शकले नाही अथवा एखाद्या जिल्हा केंद्रांवर उमेदवारांना प्रवेश देण्याची क्षमता ओलांडली गेली तर ते जिल्हाकेंद्र निवडलेल्या उमेदवारांची बैठक व्यवस्था जवळच्या दुस-या जिल्हा केंद्रावर करण्यात येईल.

५.७ एकदा निवडलेल्या जिल्हा केंद्रामध्ये अथवा आयोगाने निश्चित केलेल्या परीक्षा उपकेद्रांमध्ये बदल करण्याची विनंती कोणत्याही कारणास्तव मान्य करण्यात येणार नाही, तसेच यासंदर्भातील कोणताही पत्रव्यवहार परस्पर दफ्तर दखल करण्यात येईल.

**६. परीक्षा योजना :-**

**६.१ संयुक्त पूर्व परीक्षा :-**

**६.१.१ पूर्व परीक्षेचे टप्पे :- लेखी परीक्षा, एकूण ४०० गुण**

**६.१.२ प्रश्नपुस्तिकेचे स्वरुप:- खाली नमूद केल्याप्रमाणे दोन अनिवार्य प्रश्नपुस्तिका असतील:-**

| पेपर क्रमांक | संकेतांक | गुण | दर्जा | माध्यम | परीक्षेचा कालावधी | प्रश्नपुस्तिकेचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|---|
| **पेपर १** (अनिवार्य) | ५१४ | २०० | पदवी | मराठी व इंग्रजी | **दोन तास** | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| **पेपर २** (अर्हताकारी) | ५१५ | २०० | अभ्यासक्रमातील घटकांनुसार<br>घटक क्रमांक (१) ते (५) :- पदवी<br>घटक क्रमांक (६):- दहावी स्तर<br>घटक क्रमांक (७) : दहावी/बारावी स्तर | | **दोन तास** | |

**६.१.३ अभ्यासक्रम :-** सविस्तर अभ्यासक्रम आयोगाच्या संकेतस्थळावरील ' Candidate Information ' या सदराखालील ' Examination' अंतर्गत 'Syllabus of Examination ' येथे उपलब्ध आहे.

**६.१.४** पूर्व परीक्षेच्या दोन पेपर्सपैकी पेपर क्रमांक दोनचे गुण अर्हताकारी (Qualifying) स्वरुपाचे असून सदर पेपरमध्ये किमान **३३ टक्के गुण** प्राप्त करणाऱ्या उमेदवारांच्या पेपर क्रमांक एक मधील गुणांच्या आधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी गुणांची किमान सीमारेषा निश्चित करण्यात येईल.

**६.१.५** मुल्यमापनाच्या प्रयोजनासाठी उमेदवाराने महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षेच्या दोन्ही पेपर साठी उपस्थित राहणे अनिवार्य आहे. अन्यथा उमेदवाराचा मुल्यमापनासाठी विचार करण्यात येणार नाही.

**६.२ उत्तरपत्रिकांचे मुल्यांकन :-**

**६.२.१** वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाच्या उत्तरपत्रिकांचे मुल्यांकन करताना, उत्तरपत्रिकेत नमूद केलेल्या योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच, प्रत्येक चुकीच्या उत्तरामागे २५% किंवा १/४ एवढे गुण एकूण गुणांमधून वजा करण्यात येतील.

**६.२.२** संयुक्त पूर्व परीक्षेच्या पेपर क्रमांक १ करीता व पेपर क्रमांक २ मधील Decision making and problem solving चे प्रश्न वगळून उर्वरित प्रश्नांकरीता नकारात्मक गुणदान लागू राहील.

**६.२.३** एखाद्या प्रश्नाची एकापेक्षा अधिक उत्तरे दिली असल्यास अशा प्रश्नाचे उत्तर चुकीचे समजण्यात येऊन त्या प्रश्नाच्या उत्तराकरीता २५ % किंवा १/४ एवढे गुण एकूण गुणांमधून वजा करण्यात येतील.

**६.२.४** एखादा प्रश्न अनुत्तरित असेल तर अशा प्रकरणी नकारात्मक गुणांची पध्दत लागू असणार नाही.

**६.२.५** वरीलप्रमाणे कार्यपद्धतीचा अवलंब करताना एकूण अंतिम गुणांची बेरीज अपूर्णांकात आली तरीही ती अपूर्णांकातच गणण्यात येईल व पुढील कार्यवाही त्याच्या आधारे करण्यात येईल.

**६.२.६** वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाच्या उत्तरपत्रिकांच्या मुल्यांकनासंदर्भात आयोगाकडून वेळोवेळी निश्चित करण्यात येणाऱ्या धोरणानुसार कार्यवाही करण्यात येईल. याबाबत अद्ययावत माहिती/तपशिल वेळोवेळी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्धीपत्रकाद्वारे उपलब्ध करून देण्यात येईल.

**६.३ पूर्व परीक्षेचा निकाल:-**

**६.३.१** संयुक्त पूर्व परीक्षेस अर्ज करताना सेवेसाठी दिलेला विकल्प तसेच, संबंधित सेवेतील संवर्गाच्या परीक्षेमधून भरावयाची पदसंख्या लक्षात घेऊन मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र करावयाच्या उमेदवारांची संख्या निश्चित करण्यात येते. तसेच सामाईक पूर्व परीक्षेमधील गुणांच्या पात्रतेच्या आधारे उमेदवारांनी दिलेल्या विकल्पानुसार प्रत्येक सेवानिहाय स्वतंत्र निकाल जाहीर करण्यात येईल.

**६.३.२** संबंधित सेवेतील संवर्गाच्या परीक्षेमधून भरावयाच्या एकूण पदांच्या सुमारे १२ पट उमेदवार मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र होतील, अशा रीतीने प्रथम टप्प्यात गुणांची सीमारेषा (Cut Off Line) निश्चित करण्यात येईल. तद्नंतर, दुस-या टप्प्यात प्रत्येक आरक्षित प्रवर्ग/उपप्रवर्गातील पदांसाठी १२ पट उमेदवार उपलब्ध होण्याची निश्चिती करण्यासाठी जरुरीप्रमाणे सीमारेषा खाली ओढली जाईल. तथापि, अशा पध्दतीने मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी दुस-या टप्प्यात पात्र ठरलेले अतिरिक्त उमेदवार केवळ त्यांच्या आरक्षित पदावरील निवडीसाठी पात्र असतील.

**६.३.३** अत्युच्च गुणवत्ताधारक पात्र खेळाडू, अनाथ व दिव्यांग उमेदवारांकरीता गट-अ व गट-ब संवर्गासाठी पदे आरक्षित असल्यास प्रत्येक संवर्गासाठी स्वतंत्र गुणांची सीमारेषा निश्चित करण्यात येईल.

**६.३.४** सर्वसाधारण (अमागास) उमेदवारांकरीता विहित सीमांकन रेषेच्या आधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची उमेदवारी अंतिम निवडीच्या वेळी गुणवत्तेनुसार सर्वसाधारण (अमागास) अथवा संबंधित उमेदवाराने दावा केलेल्या वैध आरक्षित प्रवर्गासाठी विचारात घेतली जाईल. सर्वसाधारण (अमागास) उमेदवारांसाठी असलेली सीमारेषा शिथिल करुन मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेले उमेदवार अंतिम शिफारशीच्या वेळी फक्त संबंधित आरक्षित पदासाठी पात्र ठरतील.

**६.३.५** प्रत्येक प्रवर्ग / उपप्रवर्गासाठी आयोगाने निश्चित केलेल्या सीमारेषा किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणा-या उमेदवारांना त्यांनी पूर्व परीक्षेच्या अर्जामध्ये दिलेल्या माहितीच्या आधारे, ते विहित अटींची पूर्तता करतात असे समजून निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येईल.

**६.३.६** मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची बैठक क्रमांकानुसार यादी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

**६.३.७** मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांचा निकाल व निकाल जाहीर झाल्याबाबतची घोषणा आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. तसेच, मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या प्रत्येक उमेदवाराला आयोगाकडील नोंदणीकृत भ्रमणध्वनी क्रमांकावर लघुसंदेशाद्वारे वैयक्तिकरित्या कळविण्यात येईल. तथापि, लघुसंदेशाद्वारे वैयक्तिकरित्या कळविण्याची सुविधा ही अतिरिक्त सुविधा असून आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेला निकाल हाच अधिकृत मानण्यात येईल.

**६.३.८** पूर्व परीक्षा ही मुख्य परीक्षेच्या प्रवेशाकरिता उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या दृष्टिने घेण्यात येणारी चाळणी परीक्षा असल्याने मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र न ठरलेल्या उमेदवारांच्या उत्तरपत्रिकांची फेरतपासणी केली जात नाही अथवा यासंदर्भातील कोणत्याही प्रकारच्या अभिवेदनावर कार्यवाही केली जात नाही.

६.४.....

## ६.४ मुख्य परीक्षा :-

### ६.४.१ प्रश्नपत्रिकेचे स्वरुप :-

| पेपर क्रमांक | संकेताक | विषय | गुण | दर्जा/ मानक | माध्यम | एकूण कालावधी | अर्हताकारी/ अनिवार्यता | प्रश्नपुस्तिकेचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **(एक) राज्य सेवा मुख्य परीक्षा :- (१) लेखी परीक्षा १७५० गुण (२) मुलाखत २७५ गुण.** | | | | | | | | |
| १ | १००१ | भाषा पेपर-१ मराठी | ३०० | दहावी | मराठी | ३ तास | **२५ % गुणांसह अर्हताकारी** | पारंपरिक/वर्णनात्मक |
| २ | १००२ | भाषा पेपर-२ इंग्रजी | ३०० | दहावी | इंग्रजी | ३ तास | **२५ % गुणांसह अर्हताकारी** | पारंपरिक/वर्णनात्मक |
| **गुणवत्तेसाठी गणना करावयाच्या प्रश्नपत्रिका** | | | | | | | | |
| ३ | १००३ | निबंध | २५० | पदवी | मराठी / इंग्रजी | ३ तास | अनिवार्य | पारंपरिक/वर्णनात्मक |
| ४ | १००४ | सामान्य अध्ययन-१ | २५० | पदवी | मराठी / इंग्रजी | ३ तास | अनिवार्य | पारंपरिक/वर्णनात्मक |
| ५ | १००५ | सामान्य अध्ययन-२ | २५० | पदवी | मराठी / इंग्रजी | ३ तास | अनिवार्य | पारंपरिक/वर्णनात्मक |
| ६ | १००६ | सामान्य अध्ययन-३ | २५० | पदवी | मराठी / इंग्रजी | ३ तास | अनिवार्य | पारंपरिक/वर्णनात्मक |
| ७ | १००७ | सामान्य अध्ययन-४ | २५० | पदवी | मराठी / इंग्रजी | ३ तास | अनिवार्य | पारंपरिक/वर्णनात्मक |
| ८ | -- | वैकल्पिक विषय — पेपर क्रमांक ०१ | २५० | पदवी | -- | ३ तास | अनिवार्य | पारंपरिक/वर्णनात्मक |
| ९ | -- | वैकल्पिक विषय — पेपर क्रमांक ०२ | २५० | पदवी | -- | ३ तास | अनिवार्य | पारंपरिक/वर्णनात्मक |
| **( दोन ) महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा :-- (१) लेखी परीक्षा ४०० गुण (२) मुलाखत ५० गुण.** | | | | | | | | |
| १ | १०६६ | स्थापत्य अभियांत्रिकी - पेपर क्रमांक १ | २०० | बी. ई. (स्थापत्य) | इंग्रजी | ३ तास | --- | पारंपरिक/वर्णनात्मक |
| २ | १०६७ | स्थापत्य अभियांत्रिकी - पेपर क्रमांक २ | २०० | बी. ई. (स्थापत्य) | इंग्रजी | ३ तास | --- | पारंपरिक/वर्णनात्मक |
| **( तीन) महाराष्ट्र यांत्रिकी अभियांत्रिकी सेवा :- (१) लेखी परीक्षा ४०० गुण (२) मुलाखत ५० गुण.** | | | | | | | | |
| १ | १०६८ | यांत्रिकी अभियांत्रिकी - पेपर क्रमांक १ | २०० | बी. ई. (यांत्रिकी) | इंग्रजी | ३ तास | -- | पारंपरिक/वर्णनात्मक |
| २ | १०६९ | यांत्रिकी अभियांत्रिकी - पेपर क्रमांक २ | २०० | बी. ई. (यांत्रिकी) | इंग्रजी | ३ तास | --- | पारंपरिक/वर्णनात्मक |
| **( चार) महाराष्ट्र विद्युत अभियांत्रिकी सेवा/ महाराष्ट्र विद्युत व यांत्रिकी अभियांत्रिकी सेवा :- (१) लेखी परीक्षा ४०० गुण (२) मुलाखत ५० गुण.** | | | | | | | | |
| १ | १०७० | विद्युत अभियांत्रिकी - पेपर क्रमांक १ | २०० | बी. ई. (विद्युत) | इंग्रजी | ३ तास | --- | पारंपरिक/वर्णनात्मक |
| २ | १०७१ | विद्युत अभियांत्रिकी - पेपर क्रमांक २ | २०० | बी. ई. (विद्युत) | इंग्रजी | ३ तास | --- | पारंपरिक/वर्णनात्मक |
| **( पाच ) महाराष्ट्र कृषि सेवा :- (१) लेखी परीक्षा ४०० गुण (२) मुलाखत ५० गुण.** | | | | | | | | |
| १ | १०९० | कृषि विषयक सामान्य ज्ञान | २०० | कृषि पदवी | इंग्रजी | ३ तास | --- | पारंपरिक/वर्णनात्मक |
| २ | १०९१ | कृषि विज्ञान व तंत्रज्ञान | २०० | कृषि पदवी | इंग्रजी | ३ तास | --- | पारंपरिक/वर्णनात्मक |
| **( सहा) महाराष्ट्र वनसेवा परीक्षा :- (१) लेखी परीक्षा ४०० गुण (२) मुलाखत ५० गुण.** | | | | | | | | |
| १ | -- | वैकल्पिक विषय - १ | २०० | पदवी | इंग्रजी | ३ तास | --- | पारंपरिक/वर्णनात्मक |
| २ | -- | वैकल्पिक विषय - २ | २०० | पदवी | इंग्रजी | ३ तास | --- | पारंपरिक/वर्णनात्मक |
| **(सात) अन्न व औषध प्रशासकीय सेवा :- (१) लेखी परीक्षा ४०० गुण (२) मुलाखत ५० गुण.** | | | | | | | | |
| १ | १०७२ | अन्न व औषधीद्रव्ये विषयक घटक | २०० | पदवी | इंग्रजी | ३ तास | --- | पारंपरिक/वर्णनात्मक |
| २ | १०७३ | | २०० | पदवी | इंग्रजी | ३ तास | --- | पारंपरिक/वर्णनात्मक |
| **(आठ) महाराष्ट्र पशुवैद्यकीय सेवा :- (१) लेखी परीक्षा ४०० गुण (२) मुलाखत ५० गुण.** | | | | | | | | |
| १ | | **(अभ्यासक्रम लवकरच संकेतस्थळावर स्वतंत्ररित्या प्रसिद्ध करण्यात येईल)** | २०० | पदवी | इंग्रजी | ३ तास | --- | पारंपरिक/वर्णनात्मक |
| २ | | | २०० | पदवी | इंग्रजी | ३ तास | --- | पारंपरिक/वर्णनात्मक |
| **(नऊ) निरीक्षक, वैधमापनशास्त्र गट-ब :- (१) लेखी परीक्षा ४०० गुण (२) मुलाखत ५० गुण.** | | | | | | | | |
| १ | १०७४ | वैधमापनशास्त्र विषयक घटक | २०० | पदवी | इंग्रजी | ३ तास | --- | पारंपरिक/वर्णनात्मक |
| २ | १०७५ | | २०० | पदवी | इंग्रजी | ३ तास | --- | पारंपरिक/वर्णनात्मक |

**६.४.२ राज्य सेवा मुख्य परीक्षा व वनसेवा मुख्य परीक्षेकरीता वैकल्पिक विषयांची निवड करण्यासाठी, पूर्व परीक्षेचा अर्ज सादर करताना वैकल्पिक विषय निवडणे व नमूद करणे अनिवार्य आहे. सदर निवडलेल्या व नमूद केलेल्या वैकल्पिक विषयामध्ये बदल करण्याची विनंती पूर्व परीक्षेकरीता अर्ज सादर केल्यानंतर कोणत्याही टप्प्यावर मान्य करण्यात येणार नाही.**

**६.४.३** मुख्य परीक्षेकरीता वैकल्पिक विषयांची यादी व उत्तरे लिहिण्याचे माध्यम इत्यादी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केलेल्या माहिती संबंधित परीक्षेच्या/विषयाच्या अभ्यासक्रमामध्ये दर्शविण्यात आले आहे.

६.४.४ राज्य सेवा मुख्य परीक्षेच्या पेपर क्रमांक ३ ते ७ साठी उमेदवाराला प्रश्नपत्रिकेतील उत्तरे मराठी किंवा इंग्रजी यापैकी कोणत्याही एका भाषेमध्ये लिहिण्याचा पर्याय उपलब्ध असेल. मात्र सदर पाचही पेपर एकतर मराठी किंवा इंग्रजी यापैकी एकाच भाषेत सोडविणे आवश्यक राहील.

६.४.५ वैकल्पिक विषयांतील ज्या विषयांचे माध्यम आयोगाकडून " इंग्रजी " अथवा " मराठी " असे निश्चित केलेले आहे त्या विषयातील उत्तरे केवळ " इंग्रजी " अथवा " मराठी " भाषेतून लिहिणे आवश्यक आहे.

६.४.६ वैकल्पिक विषयांतील ज्या पेपरसाठी आयोगाकडून मराठी व इंग्रजी भाषेचे माध्यम निश्चित केलेले आहे, त्याकरीता उमेदवाराने मराठी अथवा इंग्रजी यापैकी एकाच भाषेची निवड करणे अनिवार्य आहे. निवड केलेल्या भाषेचे माध्यम हे वैकल्पिक विषयाच्या दोन्ही पेपरसाठी अनिवार्य राहील.

६.४.७ पूर्व परीक्षेसाठी अर्ज सादर करताना, मुख्य परीक्षेकरीता प्रत्यक्ष परीक्षेच्यावेळी उत्तरे ज्या भाषेच्या माध्यमातून लिहिण्यात येणार आहेत, त्या भाषेचे माध्यम निवडणे आवश्यक आहे.

६.४.८ अर्जामध्ये दावा केल्यानुसार व प्रवेशपत्रामध्ये दर्शविल्यानुसार उत्तरपुस्तिकेवर उत्तरे लिहिण्यासाठी भाषेचे माध्यम नमूद करणे आवश्यक आहे. नमूद केलेल्या माध्यमाव्यतिरिक्त इतर माध्यमातून लिहिलेली उत्तरे तपासली जाणार नाहीत परिणामी त्याना गुण दिले जाणार नाही.

६.४.९ राज्य सेवा मुख्य परीक्षेतील भूगोल या वैकल्पिक विषयाच्या पेपरमध्ये नकाशावर आधारित प्रश्नांसाठी उमेदवारांनी Outline Stencil वापरण्याची मुभा राहील.

६.४.१० राज्य सेवा मुख्य परीक्षेकरीता निश्चित केलेल्या वैकल्पिक विषयांपैकी विद्युत अभियांत्रिकी, यांत्रिकी अभियांत्रिकी, स्थापत्य अभियांत्रिकी, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, गणित सांख्यिकी, वाणिज्य व लेखाशास्त्र या वैकल्पिक विषयांच्या पारंपरिक स्वरुपाच्या परीक्षेमध्ये उमेदवारांना सायंटिफिक गणनयंत्राचा वापर करण्याची मुभा असेल. Programable प्रकारच्या गणनयंत्रांना परवानगी दिली जाणार नाही, आणि अशा गणनयंत्राचा वापर केल्यास उमेदवाराने अवैध मार्गाचा अवलंब केल्याचे समजले जाईल. परीक्षा कक्षामध्ये अन्य उमेदवारांकडून गणनयंत्र मागण्यास किंवा अदलाबदल करण्यास परवानगी नाही.

६.४.११ पारंपरिक स्वरुपाच्या परीक्षेच्या वेळी आयोगाकडून उमेदवारांना पुरविण्यात येणा-या मुख्य उत्तरपुस्तिकेमध्ये दिलेल्या पृष्ठांवरच उत्तरे नमूद करणे आवश्यक आहे.

६.४.१२ मुख्य उत्तरपुस्तिकेव्यतिरिक्त उमेदवारांना कोणत्याही परिस्थितीत पुरवणी उत्तरपुस्तिकेचा पुरवठा करण्यात येणार नाही.

६.४.१३ पारंपरिक स्वरुपाच्या उत्तरपुस्तिकेमध्ये उमेदवाराने प्रश्नांचे उपप्रश्न सोडविताना (अ, ब, क, ड किंवा १, २, ३, ४) सलगरित्या सोडवावे. एक उपप्रश्न एका पानावर, तर इतर उपप्रश्न काही पृष्ठे सोडून अथवा अन्य पृष्ठावर सोडविल्यास असे नंतरचे उपप्रश्न दुर्लक्षित करण्यात येतील.

**६.५ परीक्षेचे स्वरुप :-**

संयुक्त पूर्व परीक्षेमधील गुणांच्या आधारे संबंधित सेवेच्या/संवर्गाच्या मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र उमेदवारांकरीता मुख्य परीक्षेसाठी विहित करण्यात आलेल्या परीक्षा योजना व अभ्यासक्रमाच्या आधारे मुख्य परीक्षा घेण्यात येईल.

**६.५.१ मुख्य परीक्षेस प्रवेश:-**

६.५.१.१ मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी आयोगाकडून निश्चित केलेल्या गुणांची किमान सीमांकन रेषा व मर्यादेनुसार मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी अर्हताप्राप्त ठरणाऱ्या तसेच जाहिरात/अधिसूचनेतील तरतुदींनुसार आवश्यक शैक्षणिक अर्हता व अन्य अटींची पूर्तता करणा-या उमेदवारांस मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येईल.

६.५.१.२ मुख्य परीक्षेकरीता आयोगाच्या कार्यालयाकडून अधिसूचना निर्गमित झाल्यानंतर आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीच्या संकेतस्थळाद्वारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र उमेदवारांना त्यांच्या प्रोफाईलद्वारे अर्ज करता येईल. त्यावेळी मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी आयोगाकडून विहित करण्यात आलेल्या पद्धतीने जिल्हा केंद्र निवडून परीक्षा-शुल्क विहित मुदतीत सादर करणे आवश्यक राहील. त्याशिवाय उमेदवारास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येणार नाही.

**६.५.१.३ मुख्य परीक्षेच्या जाहिरात/अधिसूचनेस अनुसरून अर्ज सादर करताना उमेदवारास ज्या परीक्षेकरीता अर्ज सादर करावयाचा असेल त्या परीक्षेतील/सेवेतील संवर्गाचा पसंतीक्रम मुख्य परीक्षेचा अर्ज सादर करतेवेळी नमूद करणे अनिवार्य राहील.**

६.५.१.४ संबंधित सेवेच्या/संवर्गाच्या मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारास प्रत्येक सेवेसाठी/संवर्गासाठी विहित पद्धतीने स्वतंत्रपणे अर्ज सादर करून प्रत्येक परीक्षेसाठी स्वतंत्र विहित परीक्षा शुल्क भरावे लागेल.

६.५.१.५ जाहिरातीस अनुसरून पूर्व परीक्षेच्या प्रवेशासाठी अर्ज करतेवेळी आवश्यक ती शैक्षणिक अर्हता नसल्यास व मुख्य परीक्षेकरीता आवश्यक माहिती व परीक्षा शुल्क सादर करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत संबंधित शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्यास, अशा उमेदवाराला शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्याचा दिनांक नमूद करता येईल.**पूर्व परीक्षेच्या अर्जामधील इतर कोणत्याही दाव्यामध्ये बदल करता येणार नाही.**

**६.५.२ मुख्य परीक्षेचा निकाल:-**

६.५.२.१ संबंधित संवर्गाकरीता/सेवेकरीता भरावयाच्या एकूण पदांपैकी प्रत्येक प्रवर्ग/उपप्रवर्गासाठी सुमारे ३ पट उमेदवार मुलाखतीकरीता उपलब्ध होतील, अशा रीतीने मुख्य परीक्षेतील सर्व पेपरच्या एकत्रित गुणांच्या आधारे गुणांची किमान सीमारेषा (Cut Off Line) निश्चित करण्यात येईल. सदर सीमारेषा सर्व उमेदवारांसाठी एकच किंवा प्रत्येक सामाजिक प्रवर्ग/उपप्रवर्गासाठी तसेच समांतर आरक्षणांतर्गत विविध व्यक्तींसाठी वेगवेगळी असेल.

६.५.२.२ प्रत्येक आरक्षित प्रवर्ग/उपप्रवर्गासाठी आयोगाने निश्चित केलेल्या सीमारेषा किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणाऱ्या उमेदवारांना त्यांनी अर्जामध्ये दिलेल्या माहितीच्या आधारे, ते विहित अटींची पूर्तता करतात, असे समजून निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात मुलाखतीसाठी पात्र समजण्यात येईल.

**६.५.२.३** लेखी परीक्षेमधून मुलाखतीसाठी अर्हताप्राप्त होण्याकरीता शतमत (Percentile) पध्दत लागू आहे. परीक्षेमध्ये सर्वाधिक गुण मिळविणा-या उमेदवाराच्या एकूण गुणांच्या तुलनेत खालीलप्रमाणे किमान शतमत गुण प्राप्त करणारे उमेदवार मुलाखतीच्या पात्रतेकरीता विचार करण्यास पात्र असतील:-

(१) अमागास - किमान ३५ शतमत

(२) मागासवर्गीय - किमान ३० शतमत

(३) दिव्यांग - किमान २० शतमत

(४) अत्युच्च गुणवत्ताधारक पात्र खेळाडू - किमान २० शतमत

(५) अनाथ - किमान ३० शतमत

**६.५.२.४** दिव्यांग अथवा अनाथ अथवा अत्युच्च गुणवत्ताधारक पात्र खेळाडू या आरक्षित प्रवर्गाच्या किमान सीमा रेषेच्या आधारे मुलाखतीसाठी पात्र ठरणारा उमेदवार कोणत्याही एकाच सवलतीसाठी पात्र असेल.

**६.५.२.५** लेखी परीक्षेचा निकाल व निकाल जाहीर झाल्याबाबतची घोषणा आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

**६.५.२.६ सर्व पेपर्सना उपस्थित राहणाऱ्या उमेदवारांनाच गुणवत्तेनुसार मुलाखतीकरीता पात्र समजण्यात येईल. एकाही पेपरला उमेदवार अनुपस्थित राहिल्यास अशा उमेदवारांचा मुलाखतीकरीता विचार करण्यात येणार नाही.**

**६.५.२.७** मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या प्रत्येक उमेदवाराला आयोगाच्या ऑनलाईन अर्जप्रणालीच्या संकेतस्थळावरील संबंधित उमेदवाराच्या खात्यामध्ये मुलाखतपत्र उपलब्ध करून देण्यात येईल. तसेच भ्रमणध्वनी क्रमांकावर लघुसंदेशद्वारे वैयक्तिकरित्या कळविण्यात येईल. तथापि, वैयक्तिकरित्या लघुसंदेशाद्वारे कळविण्याची सुविधा ही अतिरिक्त सुविधा असून आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेला निकाल हाच अधिकृत मानण्यात येईल.

**६.५.२.८** अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक तसेच उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र (नॉन-क्रिमी लेयर) असलेल्या विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), विशेष मागास प्रवर्ग, व इतर मागास वर्ग आणि सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास वर्ग या सामाजिक प्रवर्गातील उमेदवार तसेच समांतर आरक्षणांतर्गत पूर्व वा मुख्य परीक्षेच्या कोणत्याही टप्प्यावर उमेदवार त्या-त्याप्रवर्गासाठी विहित केलेल्या निम्न अर्हतामानावर अर्हताप्राप्त झाल्यास उमेदवाराचा विचार फक्त त्याच प्रवर्गाकरीता करण्यात येईल, अन्य प्रवर्गाकरीता करण्यात येणार नाही. अंतिम शिफारशींच्या वेळी त्यांची उमेदवारी अराखीव(खुला) पदासाठी विचारात घेतली जाणार नाही. उमेदवाराच्या पात्रतेनुसार संबंधित आरक्षित पदावरील निवडीकरीता गुणवत्तेनुसार असे उमेदवार पात्र असतील.

**६.६ गुणपडताळणी :-**

**६.६.१** पूर्व परीक्षेकरिता गुणांची पडताळणी अथवा फेरतपासणी करण्याबाबतची निवेदने कोणत्याही परिस्थितीत विचारात घेण्यात येणार नाहीत. अशी निवेदने प्राप्त झाल्यास ती दप्तर दाखल करण्यात येतील, त्यांना कोणतीही उत्तरे देण्यात येणार नाहीत.

**६.६.२** पारंपरिक स्वरूपाच्या परीक्षा/उत्तरपुस्तिकेकरिता फक्त गुणांची पडताळणी करण्यात येते. फेरमुल्यांकन (Revaluation) केले जात नाही.

**६.६.३** आयोगाकडून कोणत्याही परीक्षांच्या उत्तरपुस्तिकांचे फेरमुल्यांकन (Revaluation) केले जात नाही. फेरमुल्यांकनाबाबतची सर्व अभिवेदने कोणतीही कार्यवाही न करता परस्पर दप्तरदाखल करण्यात येतील व या संदर्भात उमेदवारांना काहीही कळविले जाणार नाही.

**६.६.४** निकाल जाहीर झाल्यानंतर प्रोफाईलमध्ये गुणपत्रक प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून प्रसिद्धिपत्रकात विहित केलेल्या कालावधीत उमेदवाराने गुणांची पडताळणी करण्याकरिता अर्ज केल्यास त्याचा विचार केला जाईल. त्याकरिता विहित पद्धतीने अर्ज करणे तसेच प्रत्येक विषयाला आयोगाकडून निश्चित करण्यात आलेल्या दराप्रमाणे शुल्क भरणे आवश्यक आहे.

**६.७ मुलाखत:-**

**६.७.१** विहित सीमांकन रेषेनुसार लेखी परीक्षेच्या निकालाच्या आधारे मुलाखतीसाठी पात्र उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल.

**६.७.२** मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची पात्रता जाहिरात/अधिसूचनेतील अर्हता/अटी व शर्तीनुसार मूळ कागदपत्राच्या आधारे तपासली जाईल आणि अर्जातील दाव्यानुसार मूळ कागदपत्र सादर करणा-या उमेदवारांची मुलाखत घेतली जाईल.

**६.७.३** विहित कागदपत्रे सादर करू न शकणा-या उमेदवारांची उमेदवारी रद्द करण्यात येईल व त्याची मुलाखत घेतली जाणार नाही. तसेच त्याकरीता कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही.

**६.७.४** वरीलप्रमाणे लेखी परीक्षेच्या निकालाच्या आधारे मुलाखतीसाठी पात्र ठरणा-या उमेदवारांच्या मुलाखती आयोगाच्या कार्यक्रमानुसार तसेच आयोगाने निश्चित केलेल्या ठिकाणी व निश्चित केलेल्या वेळेस घेण्यात येतील.

**६.७.५** आयोगाकडून निश्चित करण्यात आलेल्या विहित वेळेनंतर मुलाखतीस उपस्थित राहणाऱ्या उमेदवारांची मुलाखत घेण्याचे नाकारले जाईल.

## ७. निकाल प्रक्रिया :-

**७.१ गुणवत्ता यादी :-**

**७.१.१** संबंधित संवर्गाच्या मुख्य परीक्षा आणि मुलाखतीमध्ये प्राप्त केलेल्या गुणांची एकत्रित बेरीज करुन सर्वसाधारण गुणवत्ता यादी (General Merit list) तयार करण्यात येईल.

**७.१.२** प्रथम सर्वसाधारण गुणवत्ता यादी आयोगाच्या संकेतस्थळावर उमेदवारांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येईल.

**७.२ अंतिम निकाल व भरती प्रक्रियेतून बाहेर पडणे(Opting out option) :-**

**७.२.१ अंतिम निकालासंदर्भात खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल :-**

**७.२.१.१** सर्वसाधारण गुणवत्ता यादी प्रसिद्ध झाल्यानंतर मुलाखतीस उपस्थित सर्व **पात्र** उमेदवारांना संबंधित सेवेच्या परीक्षेमधून भरावयाच्या संवर्ग/पदांचा पसंतीक्रम आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे विहित पद्धतीने सादर करणे अनिवार्य राहील.

**७.२.१.२** पात्र उमेदवारांना पसंतीक्रम नमूद करण्याची फक्त एकच संधी खालील अटींवर देण्यात येईल:-

(**१**) ज्या सेवेच्या परीक्षेमधून एकापेक्षा जास्त संवर्गाची आणि/अथवा विभागाची पदे भरावयाची आहेत, अशा सेवेच्या परीक्षेमधून अंतिम निवडीसाठी संवर्ग/पदाचा पसंतीक्रम सादर करणे अनिवार्य राहील. **सदर पसंतीक्रम अंतिम निकालासाठी विचारात घेण्यात येईल.**

(**२**) पसंतीक्रम विहित पद्धतीने ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे आयोगाकडून निश्चित करण्यात आलेल्या कालावधीतच सादर करणे आवश्यक राहील. अन्य कोणत्याहीप्रकारे सादर केलेला पसंतीक्रम विचारात घेतला जाणार नाही.

(**३**) पसंतीक्रम आयोगास सादर केल्यानंतर पदाच्या पसंतीक्रमात बदल करण्यासंबंधीच्या विनंतीचा कोणत्याही परिस्थितीत विचार केला जाणार नाही.

(**४**) ज्या उमेदवारांनी विहित कालावधीत पसंतीक्रम सादर केला नसेल, त्या उमेदवारांनी मुख्य परीक्षेच्या जाहिरातीस/अधिसूचनेस अनुसरून अर्ज सादर करताना दिलेला पसंतीक्रम अंतिम समजण्यात येईल. त्याकरीता स्वत:ची पदासाठीची पात्रता तपासूनच उमेदवाराने अर्जामध्ये पसंतीक्रम सादर करणे आवश्यक राहील.

(**५**) मुख्य परीक्षेस अर्ज सादर करताना उमेदवारांना पसंतीक्रम सादर करणे अनिवार्य राहील.

(**६**) मुख्य परीक्षेच्या अर्जामधील शारीरिक पात्रता व शैक्षणिक अर्हतेच्या दाव्यांच्या आधारे संबंधित संवर्ग/पदासाठी उमेदवाराची पात्रता आजमावली जाईल.

(**७**)एखाद्या संवर्गासाठी मुख्य परीक्षेच्या अर्जामध्ये दावा केलेल्या विहित शारिरिक पात्रतेच्या तसेच दाव्याच्या अनुषंगाने शैक्षणिक अर्हतेच्या अटी व शर्ती पूर्ण न करणाऱ्या उमेदवारास संबंधित संवर्गासाठी पसंतीक्रम सादर करता येणार नाही. पात्र नसतानाही पदाचा पसंतीक्रम सादर केल्यास होणाऱ्या सर्व प्रतिकूल परिणामांची जबाबदारी पूर्णत: संबंधित उमेदवाराची असेल.

(**८**) दिव्यांग उमेदवारांच्या बाबतीत शासन निर्णयान्वये दिव्यांग उमेदवारांना एखाद्या पदावर नियुक्तीसाठी अपात्र ठरविले असल्यास त्याचा संबंधित संवर्ग/पदासाठी विचार केला जाणार नाही.

**७.२.१.३** उमेदवारांकडून विहित पद्धतीने व विहित कालावधीत प्राप्त संवर्गाच्या/पदांच्या पसंतीक्रमाच्या आधारे तात्पुरती निवड यादी(Provisional Selection List) तयार करण्यात येईल.

**७.२.१.४** तात्पुरती निवड यादी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल व त्याच्या आधारे भरतीप्रक्रियेतून बाहेर पडण्याचा पर्याय (Opting Out) ऑनलाईन पद्धतीने सादर करण्यासाठी संबंधित उमेदवारांना ०७ दिवसांचा प्रसिद्धीपत्रकात कालावधी विहित करून देण्यात येईल.

**७.२.१.३** उमेदवारांकडून विहित पद्धतीने व विहित कालावधीत प्राप्त संवर्गाच्या/पदांच्या पसंतीक्रमाच्या आधारे तसेच अर्जाद्वारे उमेदवारांकडून करण्यात आलेल्या विविध दाव्यांच्या अनुषंगाने कागदपत्रांची पडताळणी/तपासणी झाल्यानंतर तात्पुरती निवड यादी तसेच भरतीप्रक्रियेतून बाहेर पडण्याचा पर्याय सादर केलेल्या उमेदवारांचा विदा[Data] लक्षात घेऊन अंतिम गुणवत्ता यादी (Final Merit List) व अंतिम शिफारस यादी (Final Recommendation List) तयार करण्यात येईल.

**७.२.१.६** " पसंतीक्रम सादर करणे " तसेच " भरतीप्रक्रियेतून बाहेर पडणे " याबाबतची कार्यवाही फक्त आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे विहित कालावधीमध्ये व विहित पद्धतीने करणे अनिवार्य असेल. यासंदर्भातील इतर कोणत्याही पद्धतीने केलेल्या विनंतीचा विचार कोणत्याही परिस्थितीमध्ये केला जाणार नाही.

**८. शिफारस** :-

**८.१** "उमेदवारांना सर्वसाधारण सूचना" तसेच भरतीप्रक्रियेतून बाहेर पडण्यासंदर्भात उमेदवारांनी दिलेले विकल्प/ पर्याय व पद/संवर्गाचे पसंतीक्रम लक्षात घेऊन अंतिम शिफारस यादी तयार करण्यात येईल.

**८.२** अंतिम शिफारस यादी तयार करताना समान गुण धारण करणाऱ्या उमेदवारांची क्रमवारी(Ranking) आयोगाच्या दिनांक १२ सप्टेंबर, २०२२ रोजीच्या प्रसिद्धीपत्रकामधील तरतुदीनुसार निश्चित करण्यात येईल.

**८.३** "**उमेदवारांना सर्वसाधारण सूचना**" मध्ये नमूद केलेल्या कार्यपद्धतीनुसार उमेदवारांच्या शिफारसी शासनाच्या संबंधित विभागाकडे पाठविण्यात येतील.

**८.४** शिफारसपात्र उमेदवारांची यादी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

**८.५** शिफारसपात्र उमेदवारांना त्यांच्या नियुक्तीसाठी शासनाकडे शिफारस करण्यात आलेली आहे किंवा नाही , याबाबत उमेदवारांच्या प्रोफाईलमध्ये कळविण्यात येईल.

**९. उत्तरपत्रिकेची प्रत व इतर तपशील :-**

**९.१** वस्तुनिष्ठ बहुपर्यायी पद्धतीच्या पेपरची उत्तरपत्रिका संबंधित परीक्षेच्या निकालानंतर आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे संबंधित उमेदवाराच्या प्रोफाईलमध्ये खालील तपशीलासह उपलब्ध करून देण्यात येईल :-

(१) मूळ उत्तरपत्रिकेची स्कॅन इमेज

(२) निकालाकरीता गृहित धरलेले/प्राप्त गुण

(३) उमेदवार पात्र असलेल्या प्रवर्गाकरीताच्या गुणांची किमान सीमांकन रेषा.

**९.२** पारंपरिक/वर्णनात्मक पद्धतीच्या पेपरची उत्तरपुस्तिका उमेदवारांना प्रोफाईलद्वारे उपलब्ध करून देण्यात येणार नाही.

**१०.** प्रस्तुत परीक्षा योजना उमेदवारांना परीक्षेचे स्वरुप समजण्यास सुलभता व्हावी, या हेतूने प्रसिध्द करण्यात येत असून यामधील कोणतीही तरतूद प्रस्तुत परीक्षेची जाहिरात / अधिसूचना, संबंधित शासन निर्णय व आयोगाच्या कार्यनियमावली यांमधील तरतुदींशी विसंगत असल्यास त्या-त्यावेळच्या परीक्षेची जाहिरात / अधिसूचना, संबंधित शासन निर्णय तसेच आयोगाच्या कार्यनियमावलीतील तरतुदी ग्राह्य धरण्यात येतील.

उप सचिव, जाहिरात

**दिनांक** :- २४ डिसेंबर, २०२५

महाराष्ट्र लोकसेवा आयोग.